Orien
Mar

Bhajanāñcī paddhati
11

भजनांची पद्धति.

पुढील प्रार्थनांविषयीं सूचना.

या पुढील प्रार्थनांमध्यें जितके जसे शब्द लिहिले आहेत, तितके तसेच प्रार्थना करण्यांत उच्चारावे, अधिक उणे न उच्चारावे, असीच आज्ञा देवाने दिल्ही नाहीं. तरी यांतील शब्दांचा अर्थ चांगला आहे, आणि जे खरे भक्त आहेत ते प्रार्थना करून वेळोवेळेस याप्रमाणें मागतात.

देव दयाळू बाप आहे, आह्मी सर्व प्रसंगीं अगत्यांप्रमाणें त्याजवळ विनंती करावी, असें त्याने सांगितलें आहे. आह्मी देवावर प्रीति करावी, आणि आपल्या पापाचा पश्चात्ताप करून येशू जो तारणारा त्याजवर विश्वास ठेवून त्याच्या नावाने देवाजवळ प्रार्थना करावी. जो कोणी असें करील त्याचें देव ऐकेल.

हे परमेश्वरा, मी पापी, मजवर दया कर. हे देवा, येशू ख्रीस्ताने आमच्या पापाचें प्रायश्चित्त केलें, याकरितां माझीं पापें क्षमा कर. इतक्याच शब्दानीं जो कोणी पश्चात्ताप करून प्रार्थना करील, त्याचें देव ऐकेल.

येशू ख्रीस्ताने जगांत असतां आपल्या शिष्यांस सांगितलें, "तुह्मी असी प्रार्थना करावी, हे आमच्या आकाशांतील बापा, तुझें नाम पवित्र मानिलें जावें, तुझें राज्य यावें. जसी आकाशांत तसी पृथ्वीवरहि तुझी इच्छा चालू व्हावी.

FORMS OF WORSHIP. No. 35 Am. Mission Series.
1841, 6th edition. 2000.

आमचें प्रतिदिवसाचें अन्न आज आह्मास दे. आणि जसें आह्मी आपल्या ऋण्यांस सोडितों, तसें तूं आमचीं ऋणें आह्मास सोड. आणि आह्मास परीक्षेच्या अवस्थेंत नेऊं नये, परंतु आह्मास दुष्टापासून सोडीव; कारण कीं राज्य, आणि सामर्थ्य, आणि गौरव, हीं सर्वकाळ तुझीं आहेत; आमेन."

येशू ख्रीस्त लोकांच्या तारणासाठीं प्राण देऊन फिरोन जिवंत झाला, असें त्याने धर्मशास्त्र पूर्ण केलें; तेव्हांपासून त्याचे शिष्य त्याच्या नामाने उघड प्रार्थना करिते झाले. त्यानी वेळोवेळ प्रसंग आणि अगत्य यांप्रमाणें येशूच्या मध्यस्थपणाकडून देवाची प्रार्थना केली. तसें सर्वानीं करावें.

शास्त्रांत लिहिलें आहे कीं, देव आत्मा आहे, आणि जे त्याचें भजन करितात, त्यानी आत्म्याने व खरेपणाने त्याचें भजन करावें. तुह्मी मागा, ह्मणजे तुह्मास दिल्हें जाईल; शोधा, ह्मणजे तुह्मास मिळेल. जो येशू ख्रीस्तावर विश्वास ठेवून देवाची प्रार्थना प्रीतीने करितो, तो उद्धार पावतो. तुह्मी निरंतर प्रार्थना करा.

मंडळींतल्या प्रार्थनेची रीत.

हे देवा, तूं प्रभूंचा प्रभू आणि राजांचा राजा आहेस. सर्व माणसें, जनावरें, सूर्य, चंद्र, तारांगणे, यांचा आणि सर्व जगाचा उत्पन्न करणारा आणि पाळणारा तूं आहेस. त्वां आह्मास उत्पन्न केलें, आणि तूं आमचें रक्षण नित्य करितोस. तूं कृपा करून प्रतिदिवसीं आह्मास अन्न वस्त्र देत आहेस. सगळी सृष्टि तुझ्या स्वाधीन आहे. सर्व पराक्रम, ज्ञान, पवित्रपण, बरेपण, हीं सर्व तुझीं आहेत. सर्व जगामध्यें

तुझ्यासारिखा कोणी नाहीं. तूं खरा देव आहेस आणि तुझ्याशिवाय दुसरा देव नाहीं. तूं सर्वदां असाच आहेस. तूं पुण्यावर अति प्रीति करितोस, आणि पुण्यवान जे आहेत त्यांजवर तूं ममता करितोस, आणि त्यांस सर्वकाळ सुख देतोस. जे लोक पापांत राहतात त्यांस तूं सर्वकाळ दुःख देसील. जे तुला ओळखतात व तुझी सेवा प्रीतीने करितात, आणि तुझ्यावर आशा ठेवितात, ते सर्वदां सुखी आहेत. आणि जे तुला सोडून दुसऱ्याचें भजन करितात, त्यांस लोकांतरीं दंड लागेल. हे परमेश्वरा आह्मी या जगाच्या सगळ्या लोकासारिखे पाप करून नरकाच्या मार्गांत पडलों आहों, आमचा व सर्व लोकांचा जन्मस्वभाव पापी आहे. आह्मास पापी मार्ग आवडला. याकारणास्तव आह्मी नरकांत पडून पापाचें फळ सर्वकाळ भोगावयास योग्य आहों. आह्मी बहुतवेळ तुला विसरलों, आणि तुझ्या आज्ञा मोडिल्या. आमचे विचार, शब्द, व कामें, या सर्वांकडून आह्मी पाप केलें. आमचीं पापें आमच्या गणनेंत येत नाहींत, परंतु तीं सर्व तुला ठाऊक आहेत. हे देवा, तूं जर आह्मास नरकाच्या अग्नींत टाकून, निरंतर दुःख लावितोस, तर हें यथायोग्य होईल. हा दंड आमच्या पापाचें योग्य फळ आहे. आह्मी आपलें पाप पदरीं घेतों. आह्मी निरूपायी, लाचार, आत्मघातक आहों. पापाची खंडणी देण्यास किंवा त्याचें प्रायश्चित्त करावयास आमचा कांहीं उपाय नाहीं. तर हे परम दयाळू परमेश्वरा, तुझी स्तुति सर्व लोकांनी करावी, कां तर त्वां पापी माणसांवर दया करून त्यांसाठीं उपाय केला आहे. पापी लोक उद्धरले जावे ह्मणोन त्वां आपला प्रिय पुत्र जगांत पाठविला. हे दयासागरा येशू ख्रीस्ता, देवाच्या पुत्रा,

तूं पापी लोकांवर कृपा करून त्यांस तारावयासाठीं जगांत आलास. त्वां अपराधी माणसांच्या बद्दल सोसणें मान्य केलें. हे येशू, त्वां आमच्या पापाचा दंड आपल्या अंगीं सोसून, आमच्या पापाची खंडणी दिल्ही. त्वां आमच्या पापाचें प्रायश्चित्त होण्यासाठीं अति दुःख सोसून आपला प्राण दिल्हा. असें त्वां आमच्या पापाचें प्रायश्चित्त केलें. हे देवा, तूं आह्मावर अणखी दया कर, तूं आपली प्रीति आह्मास समजीव, आणि आमचें अंतःकरण तुजकडे फिरीव. तुझा पवित्र आत्मा आमच्या मनांत येऊं दे, आणि त्याकडून आमचें अंतःकरण नवें व पवित्र कर. आमचा तारणारा जो येशू ख्रीस्त, त्याचा आह्मावर जो प्रेमा, तो आमच्या मनांत प्रगट कर. तूं आमचीं पापें आह्मास समजीव, आणि आह्मी पापाचा खरा पश्चात्ताप करून सर्व पापवासना सोडाव्या, ह्मणोन बुद्धि व शक्ति दे. येशू ख्रीस्त तारणारा आहे, दुसरा कोणी तारणारा नाहीं, हा निश्चय आमच्या मनांत होऊं दे. येशू ख्रीस्ताच्या पुण्येकडून आकाशांत जावयाचा उपाय आहे, दुसरा कोणताहि उपाय नाहीं, असें आह्मास निश्चय समजूं दे. येशू ख्रीस्तावर आमचा खरा विश्वास होई, असा कर. त्याजवर आमची सगळी आशा होऊं दे. त्याच्या प्रायश्चित्तावरून आमच्या सर्व पापांची क्षमा कर. अवघ्या वाईट वासना आपच्या अंतःकरणांतून काढून टाक, आणि चांगल्या वासना आमच्या मनांत उत्पन्न कर. क्रोधदृष्टीने आह्माकडे पाहूं नको. तुझा प्रिय पुत्र जो आह्मासाठीं मारिला गेला त्याजवर पाहून आह्मावर दया कर. आह्मी तुझीं लेंकरें व्हावीं, असें कर. तुझी प्रीति आह्मावर होऊं

दे, आणि आमची पूर्ण प्रीति तुजवर होऊं दे. आम्ही सर्वदां काय करावें, आणि कसें वर्त्तावें ह्याविषयीं तुझी इच्छा कसी आहे, तें आम्हास कळीव, आणि त्याप्रमाणें आम्हास चालीव. तुझ्या शास्त्राची गोष्ट आम्हास गोड लागूं दे. तें ऐकावयास आणि समजावयास आणि मानावयास आमचें मन उत्कंठित होऊं दे. तुझी सेवा करण्यांत आम्हास आनंद होऊं दे. तुझ्या आज्ञा पाळावयास आमची कांहीं शक्ति नाहीं. आमची सर्व आशा तुजवर आहे. आम्हावर दया करून आम्हास शक्ति दे. आम्हास इंद्रियदमन करावयास सामर्थ्य दे. आणि ह्या जगाच्या सर्व वाईट मोहक गोष्टींपासून आम्हास राख. आमच्या मनाला तुझ्या भक्तीचें वळण लाव. आतांपासून आम्ही कांहीं पाप न करावें, ह्मणोन आम्ही जपावें, व झटावें, व प्रार्थना करावी, असें कर. सर्व जें तुला आवडतें त्याची आवड आम्हास लागूं दे, आणि ज्या सर्वांचा तुला कंटाळा आहे, त्याचा कंटाळा आम्हास येऊं दे. जे तुझे भक्त आहेत, ते आम्हास प्रिय असावे. जे आमचें वाईट करितात त्यांची क्षमा करावयास आणि अपकाराबद्दल उपकार करावयास तूं आम्हास शिकीव. हे परमेश्वरा, आमच्य ासोयऱ्यांवर कृपा कर. तारण पावण्याची चिंता त्यांच्या मनांत उत्पन्न कर. ते सर्व तुझीं लेंकरें व्हावे, व तुझ्या मार्गांत नित्य चालावे, असें कर.

हे सर्वांच्या धनी परमेश्वरा, तूं सगळे राजे व अधिकारी यां सर्वांवर कृपा कर. त्यांस तूं सर्वदां पाहतोस आणि त्यांच्या अवघ्या कामांचा झाडा घेणार आहेस, असें त्यांस सुचीव. त्यानीं तुझें भय धरावें, आणि तुजवर

प्रीति करून तुझ्या धर्माला अनुकूळ असावें, आणि जेणेंकरून त्यांच्या प्रजेचें कल्याण यालोकीं व परलोकीं होईल, तसें त्यानी करावें, असें त्यांच्या मनास वळण लाव. आणि अवघ्या प्रजेने आपल्या अधिकाऱ्याची मर्यादा करावी. त्यानी कामसू, व राजी, व सुशील असावें, आणि परस्परें प्रीतीने वर्त्तावें, असें त्यांच्या मनास वळण लाव.

हे परमेश्वरा, विशेषेंकरून या मुलखावर दया कर. अधिकारी व प्रजा, या सर्वांस आशीर्वाद दे. तूं आपला मार्ग त्यांस शिकीव. तुझा प्रिय पुत्र येशू ख्रीस्त हा जगाचा तारणारा आहे, असें या सर्व लोकांस कळीव. त्वां सूर्य, चंद्र, अग्नि, समुद्र, उत्पन्न केले, तरी हे लोक या वस्तूंचें भजन करितात, आणि असें तुझी आज्ञा मोडून तुझा अपमान करितात, ह्मणजे तुला जो द्यावा, तो मान त्यां वस्तूंस देतात, हें तूं पाहातोस. बहुत लोक आपल्या हातानी किंवा कारागिरांच्या हातानी केलेल्या नाना प्रकारच्या मूर्त्तींचें भजन करितात, असें ते तुझा अपमान करून नरकाच्या मार्गांत जातात; त्यांवर कृपा कर. त्यांचें पाप व संकट त्यांस कळीव. आह्मास तारणाऱ्याचें अगत्य आहे, आणि येशूख्रीस्ताशिवाय दुसरा कोणी तारणारा नाहीं, असें त्यांस समजीव, आणि त्याजकडे त्यांचें मन लागे, असें कर. त्यांचें अंतःकरण फिरवून शुद्ध कर, आणि त्यांचा उद्धार कर, हे करायास तूं शक्तिमान आहेस. आणि असीच सर्व देशाच्या लोकावर दया कर. जे लोक तुला सोडून दुसऱ्या वस्तूंचें भजन करितात, त्यांचें पाप व मूर्खपण त्यांस समजीव. आणि त्यांस आपल्या मार्गांत फिरीव.

तुझें खरें शास्त्र सर्व भाषांमध्यें उतरलें जाऊन सर्व लोकांस कळावें, असें कर. आमचा तारणारा जो येशू ख्रीस्त, त्याची ओळख अवघ्या देशांतील लोकांस होऊं दे. त्याजकडून सर्व पापी लोकानी तुला शरण जाऊन तारण पावावें. तुझेंच्च भजन करावयास आणि तुझ्या आज्ञाप्रमाणें चालावयास, असें सगळ्या लोकांस उत्कंठित कर. आह्मी येशूच्या पुण्यामुळें ही विनंती करितों.

हे सर्वांहून श्रेष्ठ परमेश्वरा, गर्विष्ठांस नम्र कर. निर्दयांस दयाळू कर. अपकार करणाऱ्यांस उपकार करावयास शिकीव. शोक करणाऱ्यांस तुझ्यापासून शांति मागावयास समजीव. दुःखितांचें समाधान कर. सर्व गरीबांचे व गरजवंतांचें पोषण कर. आणि सर्व लोकानीं आकाश लोकांत जाण्याची काळजी धरावी, ह्मणोन त्यांच्या मनांत प्रेरणा कर.

हे परमेश्वरा, तूं स्थिति, पवित्रता, सुख, व ज्ञान, यासर्वांचें मूळ आहेस. आह्मी अगदी अयोग्य आणि पापी आहों, तथापि तुझे उपकार आह्मावर अगणित आहेत. आह्मी तुझे उपकार मानितों, तुला आह्मी स्तवितों. आह्मी सर्वदां तुझें स्मरण करावें, व तुजवर प्रीति करून तुझी सेवा करावी, असें आमच्या मनास वळण लाव. हे देवा, आह्मास मरणासाठीं सिद्ध कर. सर्व पाप आह्मापासून धुऊन येशू ख्रीस्ताच्या रक्तेकडून, आमचें अंतःकरण स्वच्छ कर, आणि त्याच्याच पुण्येकडून आह्मास पुण्यवान मोज.

मरणकाळीं तूं आमचें शांतवन व साह्य करावयास आह्माजवळ हो. आणि आह्मी आकाशलोकांत जाऊन सर्वकाळ तुझें गौरव पाहावें, आणि तुझी सेवा करून सुखी राहावें,

असें कर. आमचा तारणारा येशू ख्रीस्त, जो आमच्या उद्धारासाठीं मरण पावला, त्याच्याच पुण्यामुळें आह्मी हीं विनंती करितों. त्याच्या मध्यस्थपणाकडून आमचें ऐक, आणि सर्व स्तवन सर्वकाळ तुझें असो; आमेन.

कुटुंबासहित सकाळची प्रार्थना.

हे निरंतर पवित्र परमेश्वरा, तूं सर्वांहून मोठा आहेस. जे तुझ्याजवळ येतात, त्यानी तुझें भय धरून यावें. तूं सर्वत्र आहेस, असें आह्माला समजीव. आणि अंतरसाक्षी जो परमेश्वर त्यासमोर आह्मी आतां आहों, हें आह्मी ध्यानांत आणावें. तूं आहेस आणि जे तुला शोधितात त्यांस तूं फळ देतोस. आमच्या नावाने किंवा आमच्या पुण्याने नाहीं, परंतु येशू ख्रीस्त जो आमचा मध्यस्थ, व वकील, याच्या नावाने आह्मी तुझी कृपा मागतों; याजकरितां आह्मा पाप्यांवर दयादृष्टीने पाहा. आह्मी अपराधी व अयोग्य आहों, असें तुझ्याजवळ कबूल करितों. आमचीं अंतःकरणें पापी व अशुद्ध आहेत. तुझ्या आज्ञा पवित्र, व न्यायी, व चांगल्या, त्या आह्मी मोडून टाकिल्या आहेत. आमचें सर्व आचरण तुझ्यासमोर विपरीत आहे. हे दया सागरा परमेश्वरा, तूं आह्मास पापापासून सोडीव. तुझ्या इच्छेप्रमाणें चालावयास आह्मास बुद्धि दे. येशू ख्रीस्त जो तारणारा त्याच्या पुण्याकडून आह्मास शुद्ध कर. जसा तो शास्त्रनेमाप्रमाणें चालला, तसें आह्मास चालीव. आह्मी सर्व मनाने व शक्तीने तुजवर प्रीति करावी, आणि जसी आपणावर प्रीति करितों तसी सर्वांवर आह्मी प्रीति करावी, ह्मणोन बुद्धि आह्मास दे. येशू जो तारणारा त्याकडून आह्मास उद्धार व क्षमा

पावण्याचें अगत्य असें आह्मास समजीव. त्याच्या प्रायश्चित्ताचें फळ आह्मास प्राप्त होऊं दे. या जगाची आशा सोडून तुझा आश्रय आह्मी धरावा. जेथे चोर चोरीत नाहीं, आणि कीड खात नाहीं, अस्या ठिकाणीं ह्मणजे आकाशलोकांत आह्मी सांठवण ठेवावें. तुझ्या असंख्य उपकाराचें स्मरण आमच्या मनांत ठसीव. तुझ्या मोठ्या दयेकडून आह्मी आजपर्यंत वांचलों आहों. काल रात्री त्वां आह्मास सांभाळिलें. तुझ्या आधाराने निजत उठत असतां, आह्मी मरण पावलों नाहीं. तूं नित्य आह्मास अन्न वस्त्र देतोस, ह्मणोन आह्मी तुझा उपकार फार मानितों. अणखी तुझा येकुलता प्रिय पुत्र येशू ख्रीस्त आह्मास तारण व निरंतर जीवन प्राप्त होण्यासाठीं त्वां दिल्हा, ह्मणोन आह्मी तुझी स्तुति करितों. हे भगवान, सर्व वाईटपण व मोह आह्मापासून दूर कर. यांपासून आह्मास दूर ठेव, आणि योग्य कार्य करावयास शक्ति दे. या कुटुंबावर तूं दया करून प्रत्येकाला आशीर्वाद दे, आणि आपल्या राज्यांत जाण्यासाठीं योग्य कर. आईबापानी आपल्या लेंकरांस व इत घरांतल्या माणसांस धर्ममार्ग चांगला शिकवावा, असें कर. त्यानी परमेश्वराचें भय धरून त्याची सेवा करीत जावी. लेंकरानी आईबापांस सन्मान द्यावा, आणि देव आमचा बाप आहे, असें समजून त्यानी त्याच्या आज्ञा पाळाव्या, आणि त्याची कृपा पावावी, असें कर. अवघ्या ख्रीस्ती लोकास आपल्या पवित्र धर्माप्रमाणें चालीव; तेणेकरून इतर लोकानी त्यांचें योग्य आचरण पाहून तुझें गौरव करावें. अन्यधर्मी लोकांस सुवर्त्तमान पाठवून दे, आणि सर्व सृष्टींत तुझा प्रभाव होऊं दे. येशू ख्रीस्ताकडून हें सर्व मागतों; आमेन.

कुटुंबासहित संध्याकाळची प्रार्थना.

हे परमेश्वरा, तूं अवघ्या पृथ्वीचा आश्रय आहेस. सर्व प्राणिमात्रास जीवन देऊन त्यांचें रक्षण तूं करितोस. आह्मी तुझी दया व उपकार मागावयाकरितां तुझ्याजवळ येतों. तूं आकाशांत राहातोस, आणि आह्मी पृथ्वीवर आहों. तूं पवित्र आणि आह्मी पापी. तुझें व आमचें, अंतर फार आहे. तूं अनंत गौरवी, आणि आह्मी नीच. त्वां आमच्या अपराधाचा हिशोब घेतला असता, तर आह्मी नाश पावलों असतों. परंतु येशू ख्रीस्ताच्या प्रायश्चित्ताकडून तूं माणसांवर दया करितोस. त्याने आपला प्राण देऊन आह्मासाठीं तारणोपाय केला. हे दयावंत प्रभू, आकाशांतील बापा, येशूकरितां आमचीं सर्व पापें क्षमा कर. तुझ्या पवित्र आत्म्याकडून आमचें अंतःकरण नवें, पवित्र करावें. प्रभू येशू ख्रीस्ताचे खरे शिष्य होऊन, आह्मी त्याच्या मार्गांत चालावे. तुझ्या धर्मांत चालण्याने जें सुख व शांति उत्पन्न होती ती आह्मास प्राप्त होऊं दे. आमच्या इच्छेप्रमाणें नव्हे, परंतु तुझ्या इच्छेप्रमाणें आह्मास चालीव. आज रात्री आमच्या घरांतील माणसांस आशीर्वाद दे. आह्मास स्वस्थपणाने निजीव. मरी, दुःख, व अवघ्या वाईटापासून आह्मास राख. आह्मी विसांवा घेऊन सकाळीं उठून तुझी सेवा करण्यासाठीं सिद्ध व्हावे, असें कर. जसी तूं आह्मावर कृपा करितोस तसी सर्वांवर कर. गरीब व कष्टी, यांजवर तुझे उपकार असावे. भुकेल्यांला खावयास दे, रोग्यांस निरोगी कर. आणि शुभवर्त्तमान अवघ्या देशांतील लोकांस कळीव. आमचा मध्यस्थ जो येशू ख्रीस्त याकडून ही सर्व विनंती करितों; आमेन.

एकांतीं प्रार्थना.

हे परमेश्वरा, तूं सृष्टीचा अधिकारी आहेस. तुझें सामर्थ्य व दया अनंत आहे. सर्व वस्तु मात्र तुझ्या दृष्टींत आहे, आणि सगळ्यांच्या कल्पना तुला उघड आहेत. येशू ख्रीस्त तुझा प्रिय पुत्र, याकडून तुझी विनंती करावयास मला शक्ति दे. तुझें गौरव व तुझ्या स्वभावाचें पूर्ण पवित्रपण मला समजीव. हे भगवान, मी अगदी पापी आहें, तुला काय सांगूं? माझें मन अपवित्र व दुष्ट आहे, म्या कल्पना, व बोलणें, व काम, यांकडून तुझ्या पवित्र आज्ञा मोडिल्या. मी अविश्वासी होऊन तुझ्यासमोर वांकडा चाललों; असें असतांहि त्वां अनेक प्रकारच्या अरिष्टांपासून मला वांचविलें.

तुझ्या कृपेने मला अन्न वस्त्र नित्य मिळत आहे. हे तुझे मोठे उपकार कधीं फिटणार नाहींत. तुझें धर्मपुस्तक ज्यामध्यें निरंतर जीवनाची गोष्ट उघड केली आहे, तें मला मिळालें. त्याच्या गोड भाषणेकडून पश्चात्ताप व्हावा, व ती गोष्ट वाचण्यास गोड वाटावी. आकाशाचें सुख कसें मिळेल, हें त्वां मला कळविलें आहे. पाप सोडणें व तारणाऱ्यावर विश्वास धरणें, यावांचून कोणी तुझी दया पावणार नाहीं. हें त्वां उघडे सांगितलें. हे तुझे सर्व उपकार म्या तुच्छ केले, हे दयावंत देवा, मजवर कृपादृष्टीने पाहा. पापी माणसांचा नाश करायास तूं खुशी नाहींस. येशू ख्रीस्ताला शरण जाण्यास मला शक्ति दे; त्याच्या पुण्याने माझें तारण होऊं दे. माझ्या कुबुद्धीने किंवा सैतानाच्या भुलविण्याने मला फसूं देऊं नको. गर्व, अविचार, अहंकार, हे माझ्या मनांत राहूं देऊं नको. माझा तारणारा

जो येशू यासारिखें म्या गरीब, पवित्र, व निर्दोषी असावें. हे परमेश्वरा, तुजवर माझी प्रीति असूं दे. सर्व लोकांवर उपकार माझ्या हातून व्हावे असें कर, जें माझ्या आत्याला आड येतें त्याला जिंकावयास मला शक्ति दे. तुझ्या मार्गाने मला चालीव. हे परमेश्वरा तूं माझी प्रार्थना ऐक, तुझ्याजवळ माझी अर्जी आहे. सर्व जें मला अगत्य आहे, तें मजपेक्षां तूं बरें समजतोस, तूं माझा आश्रय आहेस आणि येशू माझें प्रायश्चित्त व तारण करणारा आहे. बाप, व पुत्र, व पवित्रात्मा, जो एक परमेश्वर, त्याला गौरव निरंतर असो.

शास्त्र वाचत्या वेळेस प्रार्थना.

हे परमेश्वरा, आह्मी तुझ्या गोष्टी योग्य मानून प्रीतीने वाचावें, त्यांतील संपूर्ण अर्थ आमच्या मनास उघड व्हावा, आणि आह्मी तुझें ज्ञान पावून यथायोग्य चालावें, असें येशू ख्रीस्ताकरितां आह्मी मागतों, आमेन.

मंडळींत शास्त्राचा उपदेश ऐकावयास जातांना असी प्रार्थना मनांत करावी.

हे परमेश्वरा, मला पापरूप काळोखांत घालूं नको, खऱ्या गोष्टी मला कधीं लटक्या न वाटाव्या, परंतु जें खरें तें खरेंच, आणि जें लटकें तें लटकेंच, असें म्या मानावें, विवेकी मन मला आतां द्यावें, आणि तुझ्या शास्त्रांतील सर्व गोष्टी सर्वत्र प्रगट कराव्या.

मंडळींतून जातांना मनांत असी प्रार्थना करावी.

हे भगवान, तूं येशू ख्रीस्ताच्या पुण्यामुळें मजवर दया कर. जो चांगला उपदेश म्या आतां ऐकिला, त्याविषयीं मी तुझा उपकार मानून तुला स्तवितों, त्याप्रमाणें चालावयास मला शक्ति, व आनंद, व धैर्य दे; आणि मला आकाशांतील मंडळीमध्यें जावयास सिद्ध कर.

जेवणाच्या वेळेस प्रार्थना असी करावी.

हे परमेश्वरा, येशू ख्रीस्ताच्या पुण्यामुळें आमचीं सर्व पापें क्षमा करून या जेवणास आशीर्वाद दे. आह्मी जें खातों, पितों, तें सर्व तुजपासून आहे ह्मणोन जें जें आह्मी करितों, तें तें तुझ्या गौरवासाठीं असावें. आणि जसें तूं आमच्या शरिरांस अन्न पुरवितोस, तसेंच आमच्या आत्म्यांस पवित्र आत्मा पुरवून आमचें तारण कर; आमेन.

जेवणाच्या वेळेस दुसरी प्रार्थना.

हे दयाळू परमेश्वरा, त्वां आह्मास जेवायाला घातलें अस्याने, आणि दुसऱ्या प्रकारेंहि तुझे उपकार आह्मावर अनंत झाले, ते आह्मी मानितों; आणि यापुढें येशू जो तारणारा त्यामुळें तुझी कृपा आह्मावर व अवघ्या गरीबांवर व सर्वांवर व्हावी. आणि जसें आह्मी केवळ तुझ्या कृपेनें वांचतों तसेंच आह्मी तुझी प्रीति आणि मान्यता करून चालावें, ह्मणोन तूं साह्य हो; आमेन.

साळेंत सकाळची प्रार्थना.

हे परमेश्वरा, तूं सर्वांचा पाळणारा आहेस, तुझ्या-

शिवाय खरा देव नाहीं. सर्वांनी केवळ तुझेंच भजन करावें. त्वां आह्मास राखिलें आहे. त्वां गेल्यारात्रीं फार कृपा करून आह्मास सांभाळिलें. तुझ्या कृपेनें आह्मी आज सकाळीं उठून एथें सुखरूप आलों; यांत तुझी दया फार दिसती. आह्मी तुझा उपकार मानितों. त्वां आमचें रक्षण व पोषण करावें, ह्मणोन आह्मी योग्य नाहीं. आह्मी फार पापी आहों. आमची बुद्धि जन्मापासून विपरीत आहे. आमचा जन्मस्वभाव दुष्ट, आणि आमची सगळी वर्त्तणूक पापी आहे; परंतु येशू ख्रीस्ताच्या पुण्यावरून आह्मावर दया कर. हे अति दयाळू परमेश्वरा, त्वां पापी माणसांला तारावयासाठीं आपला प्रिय पुत्र जो येशू ख्रीस्त, त्याला जगांत पाठविलें. त्यानें सर्व लोकांच्या बद्दल होऊन सर्वांची पापें आपणावर घेतलीं. त्यानें आह्मा सर्वांवर एवढी प्रीति केली कीं, आह्मास निरंतर दंडापासून सोडवावयासाठीं आमचा दंड आपणच भोगिला. आह्मास वांचवावयासाठीं त्यानें आपला प्राण सोडिला. असें त्यानें अवघ्या लोकांच्या पापाचें प्रायश्चित्त केलें. हे परमेश्वरा, तुझ्या दयेचा पार नाहीं. सर्वांनी तुझी स्तुति सर्वकाळ करावी. तूं आपल्या आत्म्याकडून आमचा स्वभाव नवा व पवित्र कर. पापाचा खरा पश्चात्ताप आमच्या मनास लाव. आमचा सर्व विश्वास, व आशा केवळ येशूवर असावी; त्याच्या प्रायश्चित्तावरून आमच्या सर्व पापांची क्षमा कर. तूं आपला मार्ग आह्मास समजीव, आणि त्यांत आह्मास सर्वदां चालीव. आह्मी प्रतिदिवसीं काय करावें आणि कसें वर्त्तावें, याविषयींची तुझी इच्छा आह्मास कळीव; आणि तसें करावयाची शक्ति आह्मास देत जा. आह्मास पापापासून

दूर राख,आणि तुझी सेवा करण्यांत आमचा आनंद सर्वदां होऊं दे.

हे परमेश्वरा, आज आह्मावर कृपा कर. या साळेस तुझा आशीर्वाद दे. या साळेच्या शिकविणाऱ्याला तूं शिकीव. याने या मुलांस यथायोग्य शिकवावें, ह्मणोन त्यांस योग्य बुद्धि व वासना दे. या पोरांस शिकण्यांत तत्पर कर; त्यांची वर्त्तणूक चांगली व्हावी, असी त्यांस बुद्धि दे. लबाडी बोलणें, कज्या करणें, शिव्या देणें, चोरी करणें, इत्यादि सर्व दुसरीं वाईट कामें टाकावीं, ह्मणोन दया करून त्यांस शिकीव. ज्या सर्व विद्येकडून मर्यादा व लाभ त्यांस होईल, त्या विद्या मिळवावयाचा यत्न करावयास त्यांच्या मनांत शक्ति दे. या सर्वांस तूं आपले खरें व राजी शिष्य कर. या सर्वांनी तुला ओळखावें, आणि भ्यावें, आणि केवळ तुला भजावें, ह्मणोन ख्रीस्तामुळें तूं यांस शिकीव.

पंतोजी व आई बाप, यांच्या आज्ञा पाळून त्यांची मर्यादा करावयास सर्वदां मुलांच्या मनांत वासना दे. आकाशलोकांत जाण्यास तयार व्हावें, हेंच जन्माचें सार्थक आहे, असें यांस समजीव. आकाशाचा मार्ग निवडावयास व त्यांत नित्य चालावयास ज्ञान व शक्ति दे. हे परमेश्वरा, असेंच तूं अवघ्या लोकांवर दया करून सर्वांस तुझ्या मार्गांत फिरवून चालीव. आपल्या निवडलेल्या लोकांचा उद्धार पूर्ण कर, येशू ख्रीस्ताच्या प्रायश्चित्तावरून मागतों; आमेन.

साळेंत संध्याकाळची प्रार्थना.

हे परमेश्वरा, तूं अनादि अनंत आहेस. एक पिढीचे लोक लवकर मरून जातात, आणि त्यांच्या मागें दुसऱ्या पिढीचे लोक होतात; आणि तेहि लवकर मरून जातात, परंतु तूं सर्वकाळ तसाच राहातोस, आणि कधीं बदलत नाहींस. हे देवा, त्वां सर्व सृष्टि उत्पन्न केली; तूं सगळ्या जीवजंतूचें रक्षण व पोषण नित्य करितोस. तुजकडून आह्मी वांचतों, व फिरतों, व राहातों. तूं सर्वकाळ सर्व ठिकाणीं राहून सगळें चांगलें वाईट पाहतोस, यास्तव सर्वांनी तुझें स्मरण करावें; आणि तुझें भय धरून तुझें भजन आणि तुझी सेवा करावी, हें योग्य आहे. जे लोक तुला ओळखतात आणि केवळ तुझ्यावर आशा ठेवून तुझेंच भजन करितात, ते सुखी आहेत; आणि जे लोक तुला सोडून दुसऱ्या वस्तूंचें भजन करितात ते मूर्ख; या लोकीं व परलोकीं दुःख पावतात. हे दयाळू परमेश्वरा, प्रतिदिवशीं तूं आह्मावर फार उपकार करितोस; आज त्वां आह्मास राखिलें आहे. तूं आपली स्तुति करावयास आह्मास शिकीव, आणि असें करावयाचें वळण आमच्या मनास लाव. तुझा उपकार आह्मी मनांत न आणून विपरीत चालत आलों, असें आह्मी फार भ्रष्ट झालों. त्वां आमचें सर्वदां बरें केलें आहे; ह्या बदल आह्मी वाईट केलें. जसी तूं आज्ञा देतोस त्याप्रमाणें आह्मी एक दिवस, किंवा एक घटका, किंवा पळभर देखील करीत नाहीं. वाईट कल्पना, वासना, लोभ, यांकडून आमचें पाप फार वाढलें आहे. आणि आमच्या अंतःकरणांत बहुत प्रकारचीं पापें उत्पन्न झालीं. आमचे शब्द व कामें पापी आहेत; आणि आमची सगळी

वर्त्तणूक पापी आहे; तथापि हे परम दयाळू परमेश्वरा, त्वां आह्मास समजाविलें आहे कीं, माझा पुत्र जो येशू ख्रीस्त त्याचें रक्त पाप्यांस सगळ्या पापापासून शुद्ध करितें, जो त्याच्या द्वारें मला शरण येतो, तो क्षमा व तारण पावेल. असी मोठी तुझी दया आहे, यास्तव सर्व सृष्टीने तुझी स्तुति सर्वदां करावी. येशू ख्रीस्तासाठीं आह्मावर दया कर. तूं पवित्र आत्म्याकडून आमचें अंतःकरण शुद्ध कर. पापाविषयीं आमच्या मनांत खरा पश्चात्ताप होऊन, येशू ख्रीस्तावर आमचा खरा विश्वास असावा, असें कर. पापाचा द्वेष व भय होण्याचा, आणि सगळें पाप चुकायाचा उपाय येशू ख्रीस्ताचें प्रायश्चित्त आहे, असें आह्मास शिकीव. आजचीं घडलेलीं पापें तूं आह्मास सुचीव; त्यांचा पश्चात्ताप करून आह्मी तीं पत्करावीं, असें कर; आणि येशू ख्रीस्तामुळें त्यांची क्षमा कर.

हे सर्वांच्या पाळणारा परमेश्वरा, आज रात्रीं आह्मास विसांवा देऊन आह्मी सकाळीं या साळेंत सुखरूप यावें, असी कृपा करून आमचा सांभाळ कर.

हे सगळ्या सृष्टीच्या बापा परमेश्वरा, तूं आमच्या सोयऱ्यांवर फार दया करून, तीं तुला ओळखावीं, असें कर. त्या सर्वांच्या अंतःकरणांत खरा पश्चात्ताप व येशूवर खरा विश्वास तूं उत्पन्न कर, आणि त्यांस आकाशाच्या मार्गांत चालीव, आणि यथाकाळीं आह्मासुद्धां त्यांस आपल्या जवळ ने.

हे जगत्स्वामी परमेश्वरा, जगांतील सर्व लोकांवर दया करून, जे नरकाच्या मार्गांत चालतात त्यांस तूं आकाशाच्या मार्गांत फिरीव. आणि अवघ्या लोकांनी तुला

ओळखावें, आणि तुझ्यावर प्रीति करावी, तुझी सेवा करावी, आणि केवळ तुजपासून सुख शोधावें असी त्यांस बुद्धि दे; येशू ख्रीस्ताकडून हें मागतों; आमेन.

सुख होण्याचा उपाय.

अभंग १, चाल कानडा.

तुह्मास मुलांहो सुख व्हावें,
तर तुह्मी देवास भ्यावें.
त्याच्याच स्वाधीन सर्व गोष्टी,
ठिकाण तयाचें सारी सृष्टी.
तयाचें इष्टत्व साधा ऐसें,
तराया उपाय पुण्य तैसें.

येशूने आज्ञास्तव केलें मरून,
तें घेतां तरावें तयाला स्मरून.
देवाचे तुह्मी मित्र व्हावें,
अक्षय सुखांत तुह्मी जावें.
होऊन राजी त्याची करा भक्ति
पक्षांत अनंत घ्यावी शक्ति.

निजण्याच्या वेळेची प्रार्थना.

अभंग २, चाल कानडा.

१ दिवस गेला, झोंपी जातों,
देवा स्मरून कीर्त्ति गातों.
२ माझी जतन रात्रीं करा,
अर्जी पुरीव हे ईश्वरा.
३ परी रात्रीं मी जर् मरेन,
अन्य दिवस जर न पाहेन.

४ पुण्य येशूचें घ्यावें,
मला आकाशलोकीं घ्यावें.
५ जेथें नाहीं पाप दुःख,
सदां केवळ पुण्य सुख.
६ येशूमुळें अर्जी ऐसी,
आकाशांतील बापापासीं.

सकाळीं उठण्याच्या वेळेची प्रार्थना.

अभंग ३, स्वर विभास.

१ अंधार सरून रात्र गेली,
पृथ्वी फिरोन दिसुं आली.

२ दयेकडून मी न मेलों,
देव हस्तें रक्षित झालों.

३ नवा दिवस क्रमवितों,
देवा नमुन विनवितों.

४ पाप दुःख यापासून,
माझें रक्षण तूं करून.

५ ज्ञान तुझें मला समजीव,
मार्गी तुझ्या मला चालीव.

६ येशूमुळें क्षमा देणें,
स्तुति सर्व आपण घेणें.

तारणाचा उपाय.

अभंग ४, १ स्वर तोडी.

१ म्या पातक केलें जेव्हां,
देव रागवला तेव्हां;
तेणे मला चिंता झाली,
परि तुला दया आली;
येशू, येशू, सौख्यकंद,
मना लागो हाचि छंद.

२ मला योग्य अति दंड,
नको घेउं त्याचा खंड;
गुन्हेगारी द्याया ऐसी,
कांहीं नाहीं माझ्या पासीं;
येशू, येशू, सौख्यकंद,
मना लागो हाचि छंद.

३ प्राप्त व्हावें मला सुख,
ह्मणोन तुवां भोगिलें दुःख;
माझ्यासाठीं प्राण दिल्हा,
ऐसें मुक्त केलें मला;
येशू, येशू, सौख्यकंद,
मना लागो हाचि छंद.

४ माझा तारणारा तूं,
दुजा आतां न चिंतु;
मला तूं न तारसील,
मज मुक्ती न होईल;
येशू, येशू, सौख्यकंद,
मना लागो हाचि छंद.

५ तुवां नेलें जग पाप,
तरीं कर माझें माफ;
पृथ्वीमध्यें सर्व प्राणी,
करो तुझी स्तुतिवाणी;
येशू, येशू, सौख्यकंद,
मना लागो हाचि छंद.

६ तुझा मी तर तूं माझा,
ऐक्य केल्या कैंचा दुजा;
मला प्रेम तुझें असो,
तुला प्रेम माझें बसो;
येशू, येशू, सौख्यकंद,
मना लागो हाचि छंद.

प्रार्थनेचें गीत.

अभंग ५, चाल धनाश्री.

१ हे परमेश्वर दयावंत,
माझी अर्जी हीच अनंत;
दयावंता, दया गुणें,
पापापासून मला धुणें.

२ अपराधी आहें जरीं,
परी पापें खोडी सारीं;
माझें मन निर्मळ कर,
पापापासून मला तार.

३ आदि गर्भीं पापी झालों,
तसा भ्रष्ट जगीं आलों;
जन्मापासून वाढतांना,
पाप मार्गें गेलों नाना.

४ मनीं राखा सत्यपणा,
असी आज्ञा तुह्मी जाणा;
पूर्ण पुण्य तें पाहिजे,
किंचित् पाप तें न कीजे.

५ परी पापी मी अपार,
अति दुष्ट गुन्हेगार;
माहा धनी तुझी आज्ञा,
केली तिची म्यां अवज्ञा.

६ जरीं दिल्हा नर्कवास,
दोष नाहीं ईश्वरास;
जरीं नर्कीं मी पडेन,
आत्म घाती मी ह्मणेन.

७ परि प्रभू दयाळुवा,
माझें तारण करणे तुवां;
नाहीं तर मी लाचार,
दुःख अनंत सोसणार.

८ गुन्हेगारी द्यावयास,
नाहीं घडत् माणसास;
होम केला फळ काय,
घडत् नाहीं हा उपाय.

९ जप, तप, वनवास,
स्नान, दान, व उपास;
गंगातीर यात्रा तीर्थ,
हे उपाय सारे व्यर्थ.

१० येशू ख्रीस्त अवतार,
केवळ तूंच तारणार;
राहिला हा येक उपाय,
यावांचून दुजा काय?

११ मी अनाथ फार श्रमी,
तुला शरण येतों स्वामी;
मला दूर लोटूं नये,
परी मला दे अभय.

१२ येशू, येशू, दयावंत,
माझी अर्जी हीच अनंत;
दया सागर, दयागुणें,
पापापासून मला धुणें.

येशूची कथा.

अभंग ६, चाल बिहाग.

१ येशूची ही स्तुती सर्वांनी करावी,
आह्मी स्वर्गवस्ती सदांची पावावी.

२ ह्मणोन देवाने दयेने भरून,
स्वपुत्र जगाचे बदल करून.

३ जगास ताराया उपाय घडिला,
पापास फेडाया खंडच भरिला.

४ या तारणाविषयीं शुभवर्त्तमानें,
आजच विस्तारें तीं ऐकिलीं काने.

५ येशूचे स्तुतीस न कोणी पुरेल,
हें तारण सदांच आश्चर्य वाटेल.

६ पापीष्ट सुटाया पवित्र तो मेला,
अस्याने स्वर्गाचा मार्ग सिद्ध केला.

७ हे येशू तुजवर विश्वास असावा.
आमच्या मनांत पश्चात्ताप व्हावा.
८ तुझ्यावर् असावें, हें आमचें प्रेम,
हें श्रवण होवो, हा आमचा नेम.
९ असेंच कराया आह्मास दे शक्ति,
या मार्गीं पाळाया नित्याने ही भक्ति.
१० आह्मास अधर्मापासून फिरीव,
तुझ्याच धर्मांत आह्मास स्थिरीव.
११ हें शुभवर्त्तमान सर्वत्र पसर,
ऐकाया सर्वांसहि सिद्धता कर.
१२ अखंड त्वां स्तुती सर्वत्र ही ध्यावी,
कां तर सर्वांनी तुलाच ती द्यावी.

दाहा आज्ञांचा सारांश.

१ (१) तुला नकोत् इतर् देव्; (२) मूर्त्ति नसो तुज् घडीव्;
(३) भ्याया नाम तूं संभाळ्;(४)आठव्, शाब्बाथ् शुद्ध पाळ्;
२ (५) आई बापास् देणें मान्. (६) करू नको कधीं खून्;
(७) नको करू व्यभिचार्; (८) आणि होउ नको चोर्;
३ (९) तोंडीं नसो खोटी साक्ष्;(१०)पर्क्या वस्तूस् नसो लक्ष्.
ह्मणजे मनीं कर्मींहि, पाप् न करो कोणीहि,
४ परि पापी प्रत्येक् जण्, शास्त्रांत् असी सत्य ह्मण्.
सर्वांस् तरि लागे दंड; परि ख्रीस्त झाला खंड्;
५ तोचि धर्में पुण्य देत्; तरेल् जो तें पुण्य घेत्.
ह्याच मार्गी आतां ये; सदा तारण् आतां घे.